Vol II Issue X

ISSN No : 2230-7850

Monthly Multidiciplinary Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume 2, Issue.10,Nov. 2012
ISSN:-2230-7850
Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# सार्वजनिक ग्रंथालयात आर्थिक प्राप्तीची साधने

दामोधर राऊत

ग्रंथपाल
सर्वोदय कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
सिंदेवाही, जि. चंद्रपुर, म.रा.

**सारांश :**

ग्रंथालय एक संस्था असून ती समाजाभिमूख आहे. या संस्थेद्वारे समाज प्रबोधनाचे उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न केला जातो. समाज प्रबोधन व शिक्षण विकासास सहाय्य या उद्दिष्टामुळे साहजिकच ग्रंथालयाचे कार्य मार्गदर्शक स्वरूपाचे असून ते सेवाभावी वृत्तीवर आधारित आहे.

## प्रस्तावना :

समाजातील सर्व संस्था हया एकमेकांशी बांधलेल्या आहेत. ग्रंथालय ही देखील एक सामाजिक संस्था आहे व ती समाजाचा एक घटक मानली जाते. सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील सर्वांच्या सेवेसाठी ग्रंथालय सदैव तत्पर असते. कोणत्याही वाचकास त्याच्या स्वयंशिक्षणात ग्रंथालय मदत करीत असते. सांस्कृतिक क्षेत्रातील प्रगती, तसेच वाड.मयीन परंपरा यांचे भविश्यकाळातील महत्व टिकविण्यासाठी ग्रंथालय सदैव तत्पर असतात.

ज्ञान वेगवेगळया प्रकारच्या ग्रंथांमध्ये सामावलेले असते. अशी पुस्तके एकत्र करण्यात ग्रंथालयांना विविध साधनांमधून प्रयत्न करावे लागतात. हे सर्व कार्य समाजात ज्ञान प्रसारण करण्यासाठीच केले जाते.

## सार्वजनिक ग्रंथालये :

सार्वजनिक ग्रंथालये त्यातील सार्वजनिक शब्दाप्रमाणे या शब्दाप्रमाणे समाजातील सर्वांसाठी उपलब्ध असतात. समाजातील सर्व स्तरांतील व्यक्ती–अध्यापक व विद्वान व्यक्तींपासून अल्पशिक्षित व्यक्तींपर्यंत–सार्वजनिक ग्रंथालयसेवेचा लाभ घेऊ शकतात. अशा ग्रंथालांचा लाभ घेणारे वाचक विविध वयोगटातील व विविध स्तरांवर शिक्षण घेतलेले व घेणारे नागरीक असतात. बहुतांश वाचक अशा ग्रंथालयात केवळ करमणुकीसाठी जातात व अशांची संख्याही जास्त असते. त्यामुळे या ग्रंथालयात सोपी, सुबोध पुस्तके व कालिके यांचा संग्रह प्रामुख्याने आढळतो. कल्पित गोष्टी, कादंबऱ्या, विनोदी लेखनसंग्रह अशा पुस्तकांना या ग्रंथालयात विशेष मागणी असते. स्थानिक समाजातील विविध व्यावसायिकांना आपापल्या व्यावसायाला उत्तेजन देण्यासाठी उपयुक्त पुस्तके उपलब्ध करून देण्याचे, तसेच स्थानिक माहिती असलेली पुस्तके संग्रहित करण्याचे काम ग्रंथपालास करावे लागते. नाटके, कथा, कादंबऱ्या यासारखी पुस्तके वाचकांना देण्याबरोबर उद्बोधक, तात्विक व शास्त्रीय पुस्तके वाचण्याची गोडी वाचकांत निर्माण करण्याचे कठिण काम ग्रंथपालास करावे लागते. सार्वजनिक ग्रंथालये विविध स्तरांवर उपलब्ध असतात. भारतात राष्ट्रीय स्तरावरील राष्ट्रीय ग्रंथालय हे सार्वजनिक ग्रंथालय कोलकाता येथे आहे. मध्यवर्ती सार्वजनिक ग्रंथालये भारतात वेगवेगळया राज्यात अस्तित्वात आहेत. महाराष्ट्राचे मध्यवर्ती ग्रंथालय मुंबई येथे आहे. त्याखालील स्तरांवर म्हणजे जिल्हा, शहरे, लहान गावे अशा जागी सार्वजनिक ग्रंथालयांचे जाळे पसरलेले आहे. ही ग्रंथालये स्थानिक पातळीवर वाचकांची सेवा करण्यात गुंतलेली असतात.

## सार्वजनिक ग्रंथालयाची व्याख्या :

सार्वजनिक ग्रंथालय ही सामाजिक संस्था आहे. समाजातील प्रत्येक गटाला ग्रंथ व माहिती सेवा उपलब्ध करून दिल्या जाते. त्यामुळे हे ग्रंथालय समाजकल्याणाची महत्वाची भूमिका बजावत असते.

## युनेस्कोच्या जाहीरनाम्याप्रमाणे :

'सार्वजनिक ग्रंथालय उपयोजकांना निशुल्क सेवा देते. हे जनतेसाठी त्यांच्या पुर्ण उपभोगासाठी खुले असते. सार्वजनिक निधीतून सार्वजनिक ग्रंथालयाचे आर्थिक व्यवहार केले जातात. ग्रंथालय शिक्षणाला सहाय्यकारी ठरते. निरंतर स्वयंशिक्षणाचे साधन आहे. हे ग्रंथालय शैक्षणिक व माहिती साहित्य संग्रहीत करते आणि भेदभाव न करता निशुल्क माहिती देते'.

## सार्वजनिक ग्रंथालयाचे आर्थिक स्त्रोत :

सार्वजनिक ग्रंथालये ही सरकार, स्थानिक स्वराज्य संस्था, नगरपालिका, ग्रामपंचायत किंवा स्वायत्त नोंदणीकृत संस्थाद्वारे चालविली जातात. सार्वजनिक ग्रंथालयामध्ये राष्ट्रीय ग्रंथालये, राज्य मध्यवर्ती ग्रंथालये, विभागीय ग्रंथालये, शहर ग्रंथालये, जिल्हा ग्रंथालय

अ–वर्ग, तालुका ग्रंथालये अ, इतर अ वर्ग, ग्रामपंचायत ग्रंथालय क – ड वर्ग याप्रकारच्या ग्रंथालयांचा समावेश होतो या ग्रंथालयाचे आर्थिक स्त्रोत म्हणजेच उत्पन्नाची साधने पुढीलप्रमाणे सांगता येतील.

### *1) वर्गणी :*

सार्वजनिक ग्रंथालयामध्ये अनेक प्रकारचे सभासद असतात. उदा. आजीव सभासद, प्रथमवर्ग, द्वितीयवर्ग सभासद यांच्याकडून दरमहा अथवा वार्शिक वर्गणी जमा होत असते. हे सार्वजनिक ग्रंथालयाचे उत्पन्नाचे प्रमुख साधन असते. ग्रंथालयाच्या विकासासाठी वर्गणी हे उत्पन्नाचे प्रमुख साधन आहे. ज्या राज्यामध्ये ग्रंथालय कायदा आहे व ग्रंथालय कर वसुल केला जातो तेथे वर्गणी किंवा अनामत रक्कम नाममात्र घेतली जाते. वाचनसाहित्य संबंधिताकडून गहाळ व खराब झाल्यास त्याची मूळ किंमत, दुप्पट वा दंड स्वरूपात रक्कम आकारली जाते. संस्थेने व महाविद्यालयांनी अवलंबिलेल्या धोरणानुसार ही आकारणी केली जाते. संस्थापरत्वे याचे स्वरूप भिन्न असू शकते.

### *2) ग्रंथालय करः*

भारतामध्ये ग्रंथालय कायदा अस्तित्वात असलेल्या राज्यामध्ये उदा. तामिळनाडू, कर्नाटक, आंध्रप्रदेश याठिकाणी ग्रंथालय कर वसुल केला जातो. कर्नाटक राज्यामध्ये जमीन महसूलीच्या 3 टक्के अनुदान राज्यशासन देते. महाराष्ट्र व प. बंगाल या राज्यामध्ये ग्रंथालय कर नाही परंतु राज्यशासन ग्रंथालयासाठी विशिष्ट रक्कम खर्च करत आहे. ग्रंथालय करापासून जमा झालेली रक्कम ग्रंथालयाच्या विकासासाठी अपूरी पडत आहे. तसेच कर वसुल करण्याचे प्रमाण विविध राज्यामध्ये भिन्न स्वरूपाचे आहे.

### *3) देणग्या :*

सभासद, नागरीक, उद्योगधंदे आणि दानशूर लोकांकडून सार्वजनिक ग्रंथालयांना देणगी स्वरूपात उत्पन्नाचे स्त्रोत उपलब्ध होतात. यामधून वाचनसाहित्य, ग्रंथालय इमारत, फर्निचर, उपकरणे इत्यादी गरजा भागविल्या जातात. प्रसंगी वस्तु स्वरूपात देणग्याही दिल्या जातात.

### *4) इतर :*

सार्वजनिक ग्रंथालये वाचकांना काही पुस्तके घरी वाचण्यासाठी विशिष्ट कालावधीसाठी देत असतात. दिलेली पुस्तके मुदतीनंतर जमा केल्यास विलंब शुल्क आकारले जाते. पुस्तक खराब केल्यास दंड आकारला जातो, रद्दीची विक्रि करणे, झेरॉक्स सेवा देणे अशा मार्गानी पैसा जमा होतो.

### *5) स्वायत्त संस्था :*

स्वायत्त संस्थाद्वारे देणगी स्वरूपात आर्थिक स्त्रोतांची उपलब्धी करणे सार्वजनिक ग्रंथालयांना शक्य असते. उदा. सिध्दि विनायक ट्रस्ट, जिंदाल ट्रस्ट इ.

### *6) स्थानिक स्वराज्य संस्था :*

ग्रामपंचायत, नगर परिषद, जिल्हा परिषद अशा संस्थाद्वारे सार्वजनिक ग्रंथालयास निधी उपलब्ध होऊ शकतो.

### *7) आमदार व खासदार फंड :*

महाराष्ट्र राज्य विधानसभा व महाराष्ट्र राज्य शासन, विधान परिषदेचे आमदार यांचे निधीतून परिशिष्ट क्र. स्थानिक 1099/प्र.क्र. 22/का1 दि. 6 मार्च 2000 अन्वये पुढील प्रमाणे अनुदान मिळू शकते. हे अनुदान ग्रंथालयाच्या वर्गाप्रमाणे दिले जाते.

| | | |
|---|---|---|
| 1.महापालिका क्षेत्र | – | 10,00,000/– |
| 2.अ वर्ग ग्रंथालये | – | 6,00,000/– |
| 3.ब वर्ग ग्रंथालये | – | 4,00,000/– |
| 4.क वर्ग ग्रंथालये | – | 2,00,000/– |
| 5.ड वर्ग ग्रंथालये | – | 1,00,000/– |

तसेच खासदाराच्या फंडातून अनुदान उपलब्ध करून दिले जाते. मुख्यमंत्री निधी हा सार्वजनिक ग्रंथालयाचा एक आर्थिक स्त्रोत आहे. ग्रंथालयाची रजत, सुवर्ण, शताब्दी महोत्सव याकरिता हे अनुदान उपलब्ध होऊ शकते. अथवा एखाद्या विशेष प्रसंगी मुख्यमंत्री आपल्या निधीतून मदत उपलब्ध करून देऊ शकतात.

### *8) राजाराम मोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानाकडून उपलब्ध होणारे आर्थिक साहाय्य :*

सार्वजनिक ग्रंथालयाच्या व्यवस्थापनाला वर्गणी, देणगी, किरकोळ जमा होणाऱ्या रकमेतून ग्रंथालय चालविणे कठिण जाते. वाचकांच्या वाढत्या गरजा, ग्रंथ, नियतकालिके, फर्निचर, जागा भाडे, विद्युतपुरवठा इत्यादींच्या वाढत्या किमतीमुळे ग्रंथालये शासनाच्या अनुदानावर अवलंबून असतात. ग्रंथालयाच्या वाढत्या गरजा भागविण्यासाठी अर्थसाहाय्याची नितांत आवश्यकता असते. ग्रंथालय चळवळीला पुरेसे अर्थसहाय्य उपलब्ध झाले नाही, तर शिक्षणपध्दती व किंबहूना समाजजीवनावर विपरीत परिणाम होतो. या गोश्टीचा विचार करून राजाराम मोहनरॉय प्रतिशठानने ग्रंथालय विकासाच्या व ग्रंथालय सेवेत सुधारणा व्हावी म्हणून अर्थसाहाय्याच्या विविध योजना कार्यान्वित केलेल्या आहेत.

देशातील सार्वजनिक ग्रंथालये समृध्द व्हावी म्हणून प्रतिश्ठान काही अर्थसहाय्याच्या योजना राबविते त्या दोन प्रकारच्या आहेत.

अ) समतुल्य सहाय्य योजना (Matching Schemè)
ब) असमतुल्य सहाय्य योजना ( Non-Matching Schemè)

समान अर्थसहाय्य योजना म्हणजे शासनाचा जेवढा निधी तेवढाच हिस्सा प्रतिष्ठानचा मिळून समतुल्य सहाय्य योजना फंड तयार होतो. तर असमतुल्य अर्थसहाय्य योजना म्हणजे प्रतिष्ठानच्या पूर्ण निधीतून राबविण्यात येणाऱ्या योजना होय.

***ग्रंथसहाय्य :***

ग्रंथ हा ग्रंथालयाचा महत्वपुर्ण घटक आहे. ग्रंथालयातील उपलब्ध व उपयोगी ग्रंथामुळेच वाचक ग्रंथालयाकडे आकर्षित होतो. ज्या ग्रंथालयात अधिक ग्रंथ असतात. अशा ग्रंथालयाचे वाचक देखील अधिक असतात. वेळोवेळी ग्रंथालयाचा ग्रंथसंग्रह वाढविण्यासाठी व्यवस्थापन प्रयत्नशील असते. ग्रंथाच्या वाढत्या किमती, वाढती संख्या, वाचकांची आवड यांचा मेळ घालणे मर्यादित उत्पन्नामुळे आर्थिक दृष्टया व्यवस्थापनास कठिण होत आहे. ग्रंथ हे ग्रंथालयाचे आधारस्तंभ आहेत. 9 व्या पंचवार्शिक योजनेत सार्वजनिक ग्रंथालयांना ग्रंथसाहाय्य या कार्यक्रमावर विचार करण्यात आला आहे. म्हणूनच प्रतिष्ठानने ग्रंथसाहाय्यता योजना सुरू ठेवली आहे. जसे ग्रंथ व इतर वाचनीय साहित्यात प्रतिष्ठानमार्फत समतुल्य व असमतुल्य सहाय्य योजना या दोन्ही योजनाअंतर्गत देण्यात येते, जेव्हा हे सहाय्य समतुल्य योजने अंतर्गत दिले जाते, तेव्हा ग्रंथाची निवड, खरेदी व ग्रंथ सार्वजनिक ग्रंथालयांना वितरण करण्याची जबाबदारी राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या ग्रंथालय विभागाची असते. तसेच ग्रंथसहाय्य केंद्रीय असमतुल्य सहाय्य योजनेद्वारे करण्यात येते, तेव्हा ग्रंथनिवड, खरेदी व वितरणाची जबाबदारी प्रतिष्ठान स्विकारते.

***1. समतुल्य ग्रंथसहाय्य :***

राजाराम मोहनरॉय ग्रंथालय प्रतिष्ठानाच्या आग्रहाने प्रत्येक घटक राज्यात तसेच केंद्रशासित प्रदेशात गठित केलेल्या राज्य ग्रंथालयाची नियोजन समिती ग्रंथ, इतर वाचनीय साहित्य आणि दृश्यमानसाहित्य वाढवण्याचा एक प्रस्ताव तयार करते. प्रतिश्ठानच्या मार्गदर्शक तत्वानुसार जे ग्रंथ योजनेद्वारा भेट म्हणून द्यावयाचे आहेत अशा भेट द्यावयाच्या ग्रंथांची सूची, तसेच ज्या सार्वजनिक ग्रंथालयांना हे ग्रंथ भेट द्यावयाचे आहेत, अशा ग्रंथालयांची सूची तयार करते. या सूचींना समितीची मान्यता मिळाल्यानंतरच ग्रंथाची खरेदी व वाटप करण्याची कार्यवाही केली जाते. नागालॅण्ड व राजस्थान या राज्यांच्या कामासाठी पुरेसा कर्मचारी वर्ग नसल्याने ग्रंथनिवड व ग्रंथवाटपाचे काम प्रतिश्ठानकडून करण्यात येते. राज्य ग्रंथालय समितीच्या निर्णयाच्या अधिन राहून निवड केलेल्या ग्रंथांची सूची, आदेशाच्या प्रती, निवड केलेल्या ग्रंथालयांच्या सूची तसेच राज्य ग्रंथालय समितीच्या निमंत्रकांनी प्रमाणित केलेल्या ग्रंथ खरेदीच्या बिलांच्या प्राप्तीनंतर प्रतिष्ठान 100 टक्के रक्कम प्रकाशकांना अदा करते. जर प्रतिष्ठानने प्रत्यक्ष प्रकाशकांना ग्रंथ खरेदीचे आदेश दिले असतील तर 75 टक्के रक्कम प्रकाशक/ग्रंथ विक्रेत्यास ग्रंथांचे देयक प्राप्त होताच अदा करते व उर्वरित रक्कम ग्रंथ वितरणाची प्रक्रिया पुर्ण केल्यानंतर अदा करण्यात येते. काही राज्ये या योजनेसाठी निधी पूर्णपणे वापरू शकली नाहीत तर तो निधी पुढील वर्षी जमा धरण्यात येतो. काही राज्यांचा निधी प्रतिष्ठानकडे प्राप्त झाला नाही, तर तो येण्याची ग्राहयता लक्षात घेऊन त्या राज्यातील ग्रंथखरेदीची देयके प्रतिश्ठान अदा करते.

***अ. महाराष्ट्र शासनाची अनुदाने :***

महाराष्ट्र राज्य सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम 1976 कलम 20 अन्वये महाराष्ट्र शासनाकडून रू. 25 लाख किंवा त्यापेक्षा अधिक रक्कम प्रतिवर्षी ग्रंथालय निधीस मिळण्याची तरतूद करण्यात आली आहे. या अधिनियमाच्या कलम 26, पोट कलम (1) आणि (2) चे खंड 4, 5 आणि 7 अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्य सार्वजनिक ग्रंथालय (सहाय्यक अनुदान आणि इमारत व साधन सामुग्री यासाठी मान्यता) नियम 1970 पुढीलप्रमाणे अनुदान उपलब्ध करून दिले आहे.

***परिरक्षण अनुदान :***

शासनाच्या सर्व सार्वजनिक ग्रंथालयांना परिरक्षण अनुदान मिळू शकते. नियम क्र. 11, 12, 13, 14, 15 आणि 18 च्या अटी पूर्ण केल्यास अनुज्ञेय खर्चाच्या 90 टक्के परिरक्षण अनुदान कमाल मर्यादेच्या अधीन राहून सुधारीत दराप्रमाणे देण्यात येते.
शासनमान्य ग्रंथालयासाठी अनुदानाचा दर

| ग्रंथालयाचा वर्ग/दर्जा | कमाल वार्शिक वेतन रू. | परिरक्षण अनुदान वेतनेत्तर रू. | एकूण अनुदान रू. |
|---|---|---|---|
| जिल्हा अ | 2,40,000 | 2,40,000 | 4,80,000 |
| जिल्हा ब | 1,28,000 | 1,28,000 | 2,56,000 |
| तालुका अ | 1,28,000 | 1,28,000 | 2,56,000 |
| तालुका ब | 96,000 | 96,000 | 1,92,000 |
| तालुका क | 48,000 | 48,000 | 96,000 |
| इतर अ | 96,000 | 96,000 | 1,92,000 |
| इतर ब | 64,000 | 64,000 | 1,28,000 |
| इतर क | 32,000 | 32,000 | 64,000 |
| वर्ग ड | 10,000 | 10,000 | 20,000 |
| फिरते ग्रंथालय | 4,000 | 4,000 | 8,000 |
| | | | (प्रति केंद्र) |
| (जास्तीत जास्त 4 षाखा प्रत्येक षाखा घटकासाठी अ व ब वर्ग ग्रंथालयांना लागू) | | | (4 केंद्रासाठी रू. 32000) |

हे अनुदान सेवक वेतन करिता 50 टक्के व ग्रंथ खरेदीसाठी किमान 25 टक्के व उर्वरीत 25 टक्के नियतकालिके, दैनिके, भाडे उपक्रम इत्यादी खर्च भागवण्यासाठी करावयाचे असते.

इतर अनुदानाप्रमाणे हेही अनुदान मंजूर करून वितरीत करण्याचे अधिकार संबंधित विभागाच्या सहाय्यक ग्रंथालय संचालकांना प्रदान करण्यात आलेले आहेत. याचबरोबर पुढील स्वरूपात शासनातर्फे अनुदान दिले जाते.

तदर्थ अनुदान : सार्वजनिक ग्रंथालयांना मान्यतेच्या प्रथम वर्शासाठी मागील वर्षाचा खर्च विचारात न घेता किमान रू. 500/– चे तदर्थ अनुदान मिळण्याची तरतूद नियमात आहे. निधी उपलब्ध असल्यास इतर अ वर्गास रू. 96,000/–, इतर ब वर्गास रू. 64,000/–, इतर क वर्गास रू. 32,000/– व ड वर्गास रू. 10,000/– कमाल तदर्थ अनुदान मिळू शकते.

प्रोत्साहन अनुदान : मान्यताप्राप्त सार्वजनिक ग्रंथालयांना खालील योजनांसाठी प्रोत्साहन अनुदान उपलब्ध होते. अतिरिक्त सभासदांच्या नाव नोंदणीसाठी – ग्रंथालयाच्या वर्गीकरणासाठी ज्या अटी आहेत त्यामध्ये अ,ब,क व ड वर्ग ग्रंथालयासाठी आवश्यक सभासद संख्येपेक्षा ग्रंथालयास अतिरिक्त सभासदांची नांवे नोंदणीसाठी रू. 6/– किंवा वार्शिक वर्गणी रू. 6/– पेक्षा कमी असेल तर त्या वर्गणी इतके प्रोत्साहन अनुदान नियम 22 अ च्या अटीस अधीन राहून ग्रंथालयास उपलब्ध होऊ शकते.

पुस्तकाच्या खरेदीसाठी : मान्यताप्राप्त सार्वजनिक ग्रंथालयाने ग्रंथालयास मिळणाऱ्या अनुदानाच्या 25 टक्के रक्कमेची ग्रंथ खरेदी प्रतिवर्शी करणे आवश्यक आहे. ही ग्रंथ खरेदी त्या वर्शामध्ये संचालकाकडून आलेल्या पुस्तकांच्या याद्यातील ग्रंथावर होणे अपेक्षित आहे. याशिवाय ग्रंथालयाने अतिरिक्त खरेदी केल्यास खालील दराने अतिरिक्त अनुदान नियम 22 ब च्या अधीन राहून ग्रंथालयास आर्थिक सहाय्य उपलब्ध होऊ शकतो.

*ग्रंथालयाचा वर्ग :*

ज्या दराने जादा अनुदान देय असेल तो दर

ब जादा खरेदी केल्यास पुस्तकांच्या खर्चाच्या 25 टक्के परंतू 15,000 किंवा त्यापेक्षा अधिक पुस्तके असलेले, सार्वजनिक ग्रंथालय, पुस्तक खरेदी करण्यासाठी असलेल्या प्रोत्साहक अनुदानास पात्र असणार नाही.
क जादा खरेदी केलेल्या पुस्तकांच्या खर्चाच्या 50 टक्के परंतू 5,000 किंवा त्यापेक्षा अधिक पुस्तके असलेले, सार्वजनिक ग्रंथालय, पुस्तके खरेदी करण्यासाठी असलेल्या प्रोत्साहक अनुदानास पात्र असणार नाही.
ड जादा खरेदी केल्यास पुस्तकाच्या खर्चाच्या 75 टक्के परंतू 1,000 किंवा त्यापेक्षा अधिक पुस्तके असलेले, सार्वजनिक ग्रंथालय, पुस्तके खरेदी करण्यासाठी असलेल्या प्रोत्साहक अनुदानास पात्र असणार नाही.

***विशेष प्रयोजनासाठी अनुदान :***

राज्य ग्रंथालय परिशदेने शिफारस केल्यानंतर मान्यताप्राप्त सार्वजनिक ग्रंथालयास रू. 10,000/– हून अधिक नसेल इतक्या रकमेचे विशेष अनुदान खालील प्रयोजनासाठी प्राप्त होऊ शकते.

1.संचालकांच्या मते महान असेल अशा एखाद्या लेखकाच्या शताब्दी महोत्सवाच्या प्रसंगी पुस्तक खरेदी करण्यासाठी.
2.मान्यताप्राप्त सार्वजनिक ग्रंथालयाने अनेक वर्शे केलेल्या सेवांच्या स्मरणार्थ रजत, सुवर्ण किंवा शताब्दी इत्यादी सारखे महोत्सव समारंभ आयोजित करण्यासाठी.
3.मान्यताप्राप्त सार्वजनिक ग्रंथालयामध्ये संचालकांच्या मते महान असलेल्या किंवा असामान्य गुणवत्ता असलेल्या ग्रंथकारांच्या किंवा व्यक्तीच्या स्मृतिप्रित्यर्थ एखादा विशेश विभाग उघडण्यासाठी.

***इमारत अनुदान :***

निधी उपलब्धतेनुसार मान्यताप्राप्त ग्रंथालयासाठी इमारत बांधण्यासाठी किंवा तीत वाढ करण्यासाठी तसेच विकत घेण्यासाठी अनुदान प्राप्त होऊ शकते. त्यासाठी ग्रंथालयाच्या व्यवस्थापनाने नियम 26 च्या सर्व अटींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये, नियम 1970 मधील नियम 26 च्या अटी पूर्ण करून तसेच नियम 28, 29 आणि 35 च्या अधीन राहून खालील दराने ग्रंथालय इमारत अनुदान प्राप्त होऊ शकते.

महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये खालील दराने ग्रंथालय इमारत अनुदान प्राप्त करू शकतील.

?

| ग्रंथालयाचा वर्ग | अनुदानाचा दर | अनुदानाची कमाल मर्यादा रक्कम रूपये | कमाल अनुदान प्राप्तीसाठी कमीत कमी रकमेचा प्रस्ताव | ग्रंथालयाचा हिस्सा टक्के / रक्कम |
|---|---|---|---|---|
| अ | जमिनीची किंमत धरून प्रकल्पाच्या अंदाजित खर्चाच्या 50 टक्के | 75,000 / — | 1,50,000 / — | 50: 75,000 / — |
| ब | जर ग्रंथालय 20,000 पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या ठिकाणी असेल तर जमिनीची किंमत धरून प्रकल्पाच्या अंदाजित खर्चाच्या 50 टक्के | 48,000 / — | 96,000 / — | 50: 48,000 / — |
| | जर ग्रं थालय 5000 ते 20,000 लोकसंख्या असलेल्या ठिकाणी असेल तर जमिनीची किंमत धरून प्रकल्पाच्या अंदाजित खर्चाच्या 60 टक्के जर ग्रंथालय 5000 पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या ठिकाणी असेल तर जमिनीची किंमत धरून प्रकल्पाच्या अंदाजित खर्चाच्या 60 टक्के | 48,000 / —<br>48,000 / — | 80,000 / —<br>73,000 / — | 40: 32,000 / —<br>40: 25,846 / — |
| क | जर ग्रंथालय 20,000 पेक्षा लोकसंख्या असलेल्या ठिकाणी असेल तर जमिनीची किंमत धरून प्रकल्पाच्या अंदाजित खर्चाच्या 50 टक्के | 24,000 / — | 48,000 / — | 50: 24,000 / — |
| | जर ग्रं थालय 5000 ते 20,000 लोकसंख्या असलेल्या ठिकाणी असेल तर जमिनीची किंमत धरून प्रकल्पाच्या | 24,000 / — | 40,000 / — | 40: 16,000 / — |

एक लाखापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या ठिकाणी ग्रंथालय असेल तर देय अनुदानाची कमाल रक्कम संचालकाकडून निश्चित करण्यात येते.

### साधन सामुग्री अनुदान :

निधी उपलब्ध असल्यास मान्यताप्राप्त ग्रंथालयास नविन फर्निचर खरेदी करणे, विद्यमान फर्निचर ऐवजी दुसरे घेणे, पुस्तकाचे पुनःस्थापन करणे, वेगवेगळया वर्गातील ग्रंथालयाकरीता ग्रंथालय संचालकाकडून वेळोवेळी विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी साधन सामुग्री खरेदी करणे किंवा दुर्मिळ ग्रंथ व नियतकालिके यांचा संग्रह करणे व त्यांचे जतन करणे यासाठी साधन सामुग्री अनुदान प्राप्त होऊ शकेल.

ग्रंथालयाची निगा राखली जावी व ग्रंथालयाचा विकास व्हावा यासाठी सदर प्रकल्प खरोखरच आवश्यक आहे आणि अंदाजित खर्च अत्याधिक नाही अशी संचालकाची खात्री पटल्यास प्रकल्पाच्या अंदाजित खर्चापैकी 50 टक्क्यापेक्षा अधिक नसेल इतकी रक्कम साधनसामुग्री अनुदान म्हणून ग्रंथालय नियम 33, 34, 35 च्या अधीन राहून प्राप्त करू शकेल.

ग्रंथालयास प्राप्त होणारी साधनसामुग्री अनुदान रक्कम ग्रंथालयाचा दर्जा, वर्गानुसार मिळणाऱ्या परिरक्षण अनुदानाच्या कमाल मर्यादेपेक्षा अधिक असणार नाही.

### संशोधनासाठी अनुदान :

मान्यताप्राप्त संशोधन व साहित्य संस्थांच्या ग्रंथालयांना वार्षिक परिरक्षण अनुदान मागील वर्षी ग्रंथालयावर केलेल्या अनुज्ञेय खर्चाच्या 75 टक्के कमाल रू. 500/– मर्यादेच्या अधिन राहून देण्यात येते.

### पुरस्कार :

मान्यताप्राप्त सार्वजनिक ग्रंथालयांनी व ग्रंथालय कार्यकर्त्यांनी व सेवकांनी केलेल्या कार्याचा गौरव करण्यासाठी शासनाने खालील योजना सुरू केल्या आहेत.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार योजना :

मान्यताप्राप्त सार्वजनिक ग्रंथालयामध्ये निकोप स्पर्धा निर्माण करून ग्रंथालय चळवळीला चालना देण्यासाठी ही योजना 1984–85 पासून सुरू करण्यात आली. राज्यातील अ, ब, क, व ड वर्गातील शहर तसेच ग्रामिण विभागातील ग्रंथालयांना खालील दराने पुरस्काराची रक्कम रोख स्वरूपात व गौरव प्रमाणपत्र देऊन करण्यात येते.

| | | |
|---|---|---|
| अ वर्ग ग्रंथालय | – | रू. 50,000/– |
| ब वर्ग ग्रंथालय | – | रू. 30,000/– |
| क वर्ग ग्रंथालय | – | रू. 20,000/– |
| ड वर्ग ग्रंथालय | – | रू. 10,000/– |

ग्रामिण व शहर विभागातून प्रत्येक वर्गातील एक–एक ग्रंथालय निवडण्यात येते. आत्तापर्यंत एकूण 135 ग्रंथालयांना पुरस्कार दिले आहेत. अर्ज व त्यासोबतची सर्व कागदपत्रे तीन प्रतीत सादर करावे लागतात.

### डॉ. एस.आर. रंगनाथन ग्रंथमित्र पुरस्कार :

ग्रंथालय कायदा अंमलात येऊन व ग्रंथालय संचालनालयाची स्थापना होऊन 25 वर्षे झालेली असल्याने राज्यातील उत्कृष्ट ग्रंथालय सेवक व कार्यकर्ता यांना पुरस्कार देण्यात येतो. त्याचप्रमाणे 1994–95 या वर्षापासून राज्यातील मान्यताप्राप्त सार्वजनिक ग्रंथालयातील एक उत्कृष्ट ग्रंथालय सेवक व उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता यांना प्रत्येकी रू. 5000/– चा डॉ. एस. आर. रंगनाथन ग्रंथमित्र पुरस्कार देण्यात येत आहे. या पुरस्काराचे वितरण डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार वितरण समारंभात करण्यात येते. सन 2003–04 पासून हे पुरस्कार विभागीय व राज्यस्तरावर देऊन पुरस्कार रक्कमेत वाढ करण्यात आली आहे. राज्यस्तरावरील पुरस्कार प्रत्येकी 25,000/– चे व विभागीय स्तरावरील पुरस्कार प्रत्येकी रू. 15,000/– इतक्या रकमेचे आहेत.

### शासकीय अनुदानाचे स्वरूप :

1.ग्रंथसंग्रह वाचनसाहित्य व दृकश्राव्य साधने या बाबीच्या खरेदी करीता प्रतिष्ठाणाकडून मोठया प्रमाणात सहाय्य उपलब्ध करून दिले जाते. या योजनेअंतर्गत ग्रंथनिवड, खरेदी व वितरण याची जबाबदारी राज्य वा केंद्र शासनाचे असते. आणि मदत करण्याची जबाबदारी राज्य ग्रंथालय समितीची असते. ग्रंथ खरेदीची रक्कम परस्पर विक्रेत्यांना प्रतिष्ठान कडून पाठविली जाते.

2.चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा, ग्रंथ प्रदर्शने, प्रशिक्षण यांच्या आयोजनाकरीता आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले जाते. याचे राज्य पातळीवरील आयोजनासाठी हे सहाय्य दिले जाते.

चर्चासत्रे व कार्यशाळा – 50,000/–

प्रशिक्षण व ग्रंथ प्रदर्शने– 10,000/– अशा प्रमाणात हे सहाय्य असते.

3.ग्रामिण व शहरी विभागातील वाचकांना ग्रंथालयाचा अधिकाधिक लाभ व्हावा या दृष्टिने फिरत्या ग्रंथालयाच्या सेवा करिता अनुदान उपलब्ध करून दिले जाते. याकरिता रू. 20,000/– इतकी मर्यादा असून, सायकल, पेटी, कपाट, वाहतूक, रिक्षा व तत्सम साधने, पुस्तके वाहून नेण्याची इतर साधने अशा स्वरूपाच्या वस्तूची खरेदी करता येते.

4.कपाटे व रॅक इत्यादी मांडणी सामानाकरीता अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जाते. याकरिता 1979–80 ते 1996 या काळात 2 कपाटे, 2 रॅक इतक्यापुरते ते मर्यादित असे. या अर्थसहाय्याप्रमाणे 50 टक्के वा रू. 2000/– प्रत्येक वर्षी दिले जात असे. सद्या याची मर्यादा 6000/– प्रतिवर्षी इतके आहे.

5.शैक्षणिक उपक्रम, दूरचित्रवाणी संच, व्ही.सी.पी. इत्यादी करिता 1987–88 मध्ये अनुदान सहाय्य देण्याची योजना अस्तित्वात आली. एक संच व 5 ध्वनिफिती इ. वस्तुच्या खरेदीसाठी वस्तूच्या किंमती एवढे अनुदान देण्यात येत असते व पुढे दरवर्षी 5 शैक्षणिक कॅसेट पुरविल्या जातात.

6. जिल्हा स्तरावरील ग्रंथालय इमारत बांधण्यासाठी व जुन्या इमारतीच्या विकास करण्यासाठी दर सहा वर्षापासून एकदा रू. 4,00,000/– इ.

अनुदान दिले जाते व शासकीय व अशासकीय तालुका गाव, शहर किंवा नगरपालिका गटातील ग्रंथालयाला हे अनुदान देण्यात येते.

***असमतुल्य अर्थसहाय्य योजना :***

1. ग्रंथसंग्रह वृध्दिसाठी प्रतिश्ठानने निवडलेल्या ग्रंथालयांना संच स्वरूपात सहाय्य केले जाते. प्रकाशकांनी मोफत पाठविलेल्या ग्रंथालयामधून व सवलती अंतर्गत निवड करून ही पुस्तके पुरविली जातात.
2.केंद्र पुरस्कृत ग्रंथालयांना ग्रंथ संग्रह वृध्दिसाठी अर्थसहाय्य पुरविले जाते. शाळेत जाणाऱ्या 15 ते 35 वयोगटातील लोकांकरीता ती योजना राबविण्यात येते.
3.चर्चासत्रे, परिशद इत्यादीकरीता दरवर्षी एकदा चर्चासत्र व परिशद आयोजनासाठी हे अर्थसहाय्य केले जाते. एकूण खर्चाच्या 50 टक्के व कमाल रू. 50,000/— पर्यंत हे अर्थसहाय्य पुरविण्यात येते.
4.ग्रंथालय सेवा पुरविणाऱ्या स्वयंसेवी संघटनांना केंद्रसरकारकडून 1985—86 पर्यंत अर्थसहाय्य साधनसामुग्रीकरीता उपलब्ध करून देण्यात येत असे. सध्या ही योजना प्रतिष्ठानकडे सोपविण्यात आलेली आहे. ग्रंथखरेदी व फर्निचर इत्यादी साधन सामुग्रीकरीता एकूण प्रस्तावाच्या 60 टक्के इतके अनावर्ती सहाय्य, इमारत बांधणी 40 टक्के वा जास्तीत जास्त 50,000/— रू. व समाधानकारक बांधकामाकरीता 1,50,000/— रू. असे वर्ष आवर्ती अनुदान असे. सर्वसाधारण अनुदान आता यामध्ये बदल करण्यात आलेला आहे व त्याचे स्वरूप 75.25 इतक्या प्रमाणात बांधकामाकरीता व दहा वर्षातून एकदा आणि जास्तीत जास्त 3,00,000/— रू. पर्यंत. प्रतिष्ठान सहाय्य करते. फर्निचर करीता तीन वर्शाला 30,000/— रू. ग्रंथ खरेदीकरीता 15,000/— रू. असे याचे स्वरूप असून 10 टक्के रक्कम ग्रंथ बांधणीसाठी वापरता येते.
5.बाल ग्रंथालयांसाठी व बालविभाग याकरीता बालवाड.मय, तक्ते, नकाशे, पृथ्वी अर्धगोल, शैक्षणिक खेळणी, सूचना फलक, दृकश्राव्य साधने, कपाटे, रॅक, खेळ इत्यादीकरीता दरवर्शी रू. 10,000/— इतके अनुदान 50 टक्के ग्रंथखरेदी व 50 टक्के इतर अशा वस्तू खरेदी करण्याकरीता तरतूद आहे.
6.शताब्दी वर्ष, 125 वर्ष, 150 वर्ष, 175 वर्ष साजरे करण्यासाठी 1997—98 मध्ये ही योजना कार्यान्वित झालेली आहे. रूपये 50,000/— इतके अनुदान रंगरंगोटी, इमारत दुरूस्ती, चर्चासत्रे, निबंध स्पर्धा, स्मरणिका, कर्मचाऱ्यांना बक्षिसे यांचेकरीता हे अनुदान निर्धारीत प्रमाणात खर्च करावयाचे असते.

वरील बाबीवरून राजाराम मोहनरॉय ग्रंथालयाने सार्वजनिक ग्रंथालयाकरीता उपलब्ध केलेले आर्थिक सहाय्य सुस्पष्ट होते. यासाठी निर्धारीत अटी, शर्ती यांचे पालन संस्थांनी करणे आवश्यक असते. याचबरोबर संशोधन संस्थांशी, संलग्न ग्रंथालये, औद्योगिक संस्थांशी संलग्न ग्रंथालये, बॅका व तत्सम संस्था यांची ग्रंथालये ही त्या त्या मातृसंस्थांच्याद्वारे उपलब्ध केलेल्या आर्थिक स्त्रोतातून ग्रंथालयाची उभारणी व विकास करत असतात.

***संदर्भसूची :***

1)बुवा, जी.ए. : ग्रंथालय व माहितीशास्त्र व्यवस्थापनाचे नवे प्रवाह, श्री. साई प्रकाशन, बांद्रा, सावंतवाडी, प्रथम आवृत्ती 2007
2)थोरात, लक्ष्मण : ग्रंथालय माहितीशास्त्र, डायमंड प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती 2007
3)फडके, द.ना. : ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकीकरण, युनिर्व्हसल प्रकाशन, पुणे, सुधारीत चौथी आवृत्ती, 2010
4)पारखी, गंगाधर : ग्रंथालयशास्त्र परीचय, युनिर्व्हसल प्रकाशन, पुणे, सुधारीत आवृत्ती 2 : 6 मे 2008

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium    Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net